# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## जाहीर प्रकटन

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(ञ)/[30(4)(j)] नुसार विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या दोन सदस्य पदाच्या निवडणूक निकालाबाबत.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३०(४)(ञ)/[30(4)(j)] नुसार विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या दोन सदस्य पदाची निवडणूक सूचना संदर्भ क्र. साफुपुविनि/३०(४)(ञ)/३३९, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२३ नुसार बुधवार दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी जाहीर करण्यात आली होती. सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र. १ मधील १० (८) नुसार जर वैध नामनिर्देशनांची संख्या, भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर, निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांना निवडून आले असल्याचे घोषित करण्यात येईल, अशी तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेवरील सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी प्राप्त झालेल्या अंतिम वैध नामनिर्देशनांची संख्या, त्या-त्या प्रवर्गातून भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसल्यामुळे निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास म्हणजे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये खालील उमेदवार निवडून आल्याचे घोषित करण्यात येत आहे.

| | **प्रवर्ग : निर्वाचित अध्यापक** |
|---|---|
| (१) | **डॉ.जगताप संगिता विजय**<br>पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे<br>बाबुरावजी घोलप महाविद्यालय,<br>सांगवी, पुणे - ४११०२७ |
| | **प्रवर्ग : महिला** |
| (२) | **डॉ.श्रीमती एकबोटे ज्योत्स्ना गजानन**<br>प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी,<br>११८६ ए, शिवाजीनगर,<br>पुणे - ४११००५ |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ६२ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार निवडून आलेल्या सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ३१ ऑगस्ट, २०२७ पर्यंत अथवा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ६३ व ६४ मधील तरतूद अथवा महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेशांच्या अधीन राहून यापैकी जे अगोदर घडेल त्या तारखेस संपुष्टात येईल.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/३५८
दिनांक : २५/१०/२०२३

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

**प्रत** : सर्व संबंधित सदस्य

**प्रत** : माहितीसाठी

१) मा. कुलगुरू कार्यालय
२) मा. प्र-कुलगुरू कार्यालय
३) मा. कुलसचिव कार्यालय
४) मा. वित्त व लेखा अधिकारी
५) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
६) उपकुलसचिव, सभा व दप्तर विभाग
७) उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग
८) सहायक कुलसचिव, सर्वसाधारण विभाग